**(eFiling) फौ.कि.क्र.१९/२०२५**
**निशाणी क्र.७**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अन्वये व्हेरीफिकेशन**

MHPU180001412025

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की-

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | आशिष हरिश्चंद्र चाबुकस्वार, |
| वय | - | ३९ वर्षे, व्यवसाय- नोकरी, |
| राहणार | - | भीमनगर, दौंड, ता. दौंड, जि. पुणे. |

दि.१५/१२/२०२४ रोजी पूर्वेकडे आम्ही ३ फुटाची जागा सोडली होती. तेथे साळवे यांनी अतिक्रमण केले आहे. त्यावेळी आम्ही विचारण्यास गेलो तेव्हा त्यांनी आम्हाला शिवीगाळ केली. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनला कम्पलेन्ट करण्यासाठी गेलो. त्यांनी काहीही दखल घेतली नाही. त्यानंतर आम्ही दि.१८/१२/२०२४ रोजी पोस्टाने एस.पी. ऑफिसला, दौंड पोलिस स्टेशनला, गृह मंत्रालयाला तक्रार पाठविली. तिकडून काहीच झाले नसल्याने आम्ही कोर्टात केस दाखल केली. आमचे एवढेच म्हणणे आहे की, आमच्याकडे सर्व डॉक्युमेन्ट आहेत, ७/१२ आहे, त्यांच्याकडे कुठलेही डॉक्युमेन्ट नाही तरी ते आम्हाला पकडलेली जागा आहे असे म्हणतात. उदय साळवे हे एस.पी. ऑफिसला नोकरीला असल्याने पोलिस आमच्या बाजूने केस दाखल करून घेत नाहीत. तरी माझी एवढीच विनंती आहे की, त्यांना कठोर शिक्षा व्हावी.

वा.दा.ब.अ.क.के.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BADGUJAR GAJANAN SHIVDAS
Date: 2025.04.22 12:40:04 +0530

सही ----------

दिनांकः २२/०४/२०२५.

(जी.एस.बडगुजर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.४), दौंड.